॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १३२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

*** सुविचार ***

कडू बोलणाऱ्या मित्रापेक्षा गोड
बोलणारा शत्रू जास्त धोकादायक असतो.

SPOT NEWS

शरद पवार पुन्हा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

● **मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. निर्जलीकरणामुळे तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आल्याचे सुप्रिया सुळे यांनी एक्स पोस्टच्या माध्यमातून सांगितले आहे. पूर्ण आराम करण्यासाठी सांगितले तरी ते आराम करत नाहीत. ते कुणाचे ऐकत नाहीत. त्यांचे त्यांच्या कामावर प्रेम आहे, असेही सुप्रिया सुळे यांनी पोस्टमध्ये लिहिले. सुप्रिया सुळे यांनी पोस्टमध्ये लिहिले, डिहायड्रेशनचा त्रास झाल्याने बाबांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी त्यांना प्रवास कमी करण्याचा तसेच विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. पण बाबा ऐकत नाहीत. त्यांना कामात रमून जायला आवडते.

पुणे गोळीबार प्रकरणाचा तपास फास्टट्रॅकवर

● **पुणे** – पुण्यातील शिवाजीनगर जिल्हा कोर्ट परिसरात आरोपीवर गोळीबार आणि कोयत्याने वार केल्याचा थरार घडला. या घटनेने पुण्यातील वाढती गुन्हेगारीवरून विरोधकांनी एकच हल्लाबोल केला. कायदा आणि सुव्यवस्थेवर मोठा सवाल उपस्थित करण्यात आला. सातत्याने गुन्हेगारी घटना घडत असल्याने नेते चिंता व्यक्त करत असतानाच ही भयावह घटना घडली. या घटनेनंतर उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार ॲक्शन मोडवर आल्या आहेत. त्यांनी याप्रकरणाचा तपास फास्टट्रॅकवर करण्याचे आदेश दिल्याची माहिती दिली आहे. विरोधकांनीच नाही तर शरदचंद्र पवार राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार त्यांच्यावर तिखट प्रतिक्रिया दिली होती. पुण्यातील शिवाजीनगर कोर्ट बाहेर झालेल्या गोळीबार आणि हल्ला प्रकरणानंतर सुनेत्रा पवार ॲक्शन मोडवर आल्या आहेत. पुणे पोलिसांची तातडीने बैठक बोलावली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्यासह सर्व वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

मुंबई महापालिकेला पुन्हा धमकीचा मेल

● **मुंबई** – महापालिकेला पुन्हा धमकीचा मेल आला असल्याची माहिती समोर येत आहे. सतत येत असलेल्या धमकीच्या मेलमुळे खळबळ उडाली असून या मेलमध्ये महानायक अमिताभ बच्चन यांच्या 'जलसा' बंगल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. तर महालक्ष्मी, सायन्स आचार्य मेट्रो स्टेशनवर बॉम्ब ठेवल्याचा दावा करण्यात आला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगरपालिकेच्या ई-मेल आयडीवर सकाळी १०.१२ मिनिटांनी मेल आला आहे. मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय, मेयर ऑफिस उडवून टाकरण्याची धमकी या मेलमध्ये देण्यात आली आहे. एवढेच नाही तर, अमिताभ बच्चन यांचा 'जलसा' बंगला उडवण्याची धमकी देखील या ई-मेल मध्ये देण्यात आली आहे.

पालक सचिवांकडून दुष्काळी गावांची पाहणी

पालक सचिव प्रवीण दराडे यांनी पाथर्डी, शेवगाव तालुक्यांतील पाणीटंचाईचा घेतला आढावा । शेतकरी, ग्रामस्थांशी साधला संवाद

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यांतील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्ह्याचे पालक सचिव तथा सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी दुष्काळग्रस्त गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी टँकरद्वारे सुरू असलेल्या पाणीपुरवठ्याची पाहणी करून पाणीटंचाईची सद्यस्थिती जाणून घेतली. तसेच शेतकरी, ग्रामस्थ आणि स्थानिक लोकप्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पाथर्डीचे उपविभागीय अधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे, पाथर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दराडे यांनी पाथर्डी शहर, खर्डा फाटा, डांगेवाडी, माळी बाभूळगाव, निवडुंगे तसेच शेवगाव तालुक्यातील राक्षी या गावांना भेटी देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था आणि नागरिकांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली.

राक्षी येथे टँकर भरण्यासाठी करण्यात आलेली



व्यवस्था तसेच टँकरद्वारे विविध गावांना पाणीपुरवठा करण्याच्या प्रक्रियेची त्यांनी पाहणी केली. टँकर भरण्याची ठिकाणे, पाणी वितरणाची पद्धत, पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि पाथर्डी व शेवगाव तालुक्यांतील गावांना होणारा पाणीपुरवठा याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

दुष्काळाचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांवर होत असल्याने दराडे यांनी गावभेटीदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधला. पिण्याच्या पाण्याची टंचाई, शेतीसाठी पाण्याची उपलब्धता, पिकांचे नुकसान, जनावरांच्या चाऱ्याची समस्या तसेच दैनंदिन जीवनातील अडचणींबाबत त्यांनी ग्रामस्थांकडून माहिती घेतली.

डांगेवाडी येथे सरपंच सोमनाथ अकोलकर यांनी दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या पालक सचिवांसमोर मांडल्या. स्थानिक पातळीवरील पाणीटंचाई, नागरिकांच्या गरजा आणि आवश्यक उपाययोजनांकडे त्यांनी लक्ष वेधले. ग्रामस्थांनी मांडलेले प्रश्न तसेच प्रत्यक्ष पाहणीदरम्यान निदर्शनास आलेल्या परिस्थितीची दराडे यांनी नोंद घेतली.

दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना दिलासा देण्यासाठी पाणीपुरवठ्याचे प्रभावी नियोजन, उपलब्ध पाणीसाठ्याचा योग्य वापर आणि स्थानिक समस्यांचे निराकरण करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पालक सचिवांनी विविध गावांतील परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. नागरिकांनी मांडलेल्या अडचणी, पाणीपुरवठ्यातील समस्या आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती संकलित केली.

या पाहणी दौऱ्यातून प्राप्त झालेली माहिती आणि दुष्काळग्रस्त भागातील वस्तुस्थितीचा अहवाल वरिष्ठ स्तरावर मांडण्यात येणार आहे. त्यानुसार संबंधित प्रश्नांच्या निवारणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत पुढील कार्यवाही केली जाणार आहे. वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी थेट गावांमध्ये जाऊन नागरिकांशी संवाद साधल्यामुळे स्थानिक समस्यांची वस्तुस्थिती जाणून घेण्यास मदत झाली आहे.

काँग्रेस अलर्ट मोडवर, सर्व खासदारांना दिल्लीत दाखल होण्याच्या सूचना

● **मुंबई । वीरभूमी–**

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत असून ३० नोव्हेंबरला भाजप सरकारने विशेष अधिवेशन बोलावले आहे. याच अधिवेशनात डिलिमिटेशन बिल देखील सादर होण्याची शक्यता आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आता घडामोडींना वेग आला आहे. काँग्रेसकडून आपल्या सर्व खासदारांना दिल्लीत दाखल होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. २९ नोव्हेंबर रोजी सकाळी दहाच्या आत दिल्लीमध्ये हजर व्हा, अशा सूचना पक्षाच्या वतीने खासदारांना देण्यात आल्या आहेत. काँग्रेसच्या सर्व खासदारांची एकत्र बैठक होण्याची देखील शक्यता आहे. ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबरपर्यंत या काळात संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून या अधिवेशनात डिलिमिटेशन बिल सादर केले जाण्याची शक्यता आहे. काँग्रेसकडून या बिलाला जोरदार विरोध होत आहे.कॅलेंडर पहा

दरम्यान यापूर्वी देखील एकदा केंद्रातील भाजप सरकारकडून डिलिमिटेशन बिल सादर करण्यात आले होते. मात्र ते मंजूर होऊ शकले नाही. मात्र यावेळी भाजपाने मतांचे गणित लक्षात घेऊन आधीच खासदारांच्या आकड्याची जुळवाजुळव केल्याची चर्चा आहे. या बिलाला एनडीएचे घटक पक्ष नसलेले देखील काही पक्ष पाठिंबा देण्याच्या तयारीमध्ये आहेत. तामिळनाडूमधील मोठा पक्ष असलेल्या डीएमकेने या बिलाला पाठिंबा देण्याची तयारी दाखवली आहे. जर सर्व राज्यांना ५० टक्के जागा मिळणार असतील तर आम्ही पाठिंबा देण्याचा विचार करू असे स्टॅलिन यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून देखील या बिलाला पाठिंबा दिला जाऊ शकतो.

शरद पवार गटाकडून खासदारांना व्हीप

दरम्यान ३० नोव्हेंबर रोजी विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून आपल्या सर्व खासदारांना व्हीप लागू करण्यात आला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मुख्य प्रतोद खासदार अमोल कोल्हे यांनी सर्व खासदारांना व्हीप जारी केला आहे. अधिवेशन काळात सर्वांनी सभागृहात हजर राहावे, तसेच पक्ष जी भूमिका घेईल तिला पाठिंबा द्यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तर काँग्रेसकडून सर्व खासदारांना दिल्लीत बोलावण्यात आले आहे.

लोकसभेत किती मते लागणार?

संविधान दुरुस्तीशी संबंधित विधेयकांसाठी सरकारच्या फ्लोर मॅनेजर्सच्या अंदाजानुसार लोकसभेत सुमारे ३६० मतांची गरज भासू शकते. भाजपप्रणित एनडीएकडे सध्या ३१९ खासदार असल्याचा हिशेब मांडला जात आहे. यात २४१ खासदार एकट्या भाजपचे आहेत.

तरीही १० खासदार कमीच

नव्या समीकरणात एनसीपीआयचे २० आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ८ खासदार जोडल्यास एनडीएचा आकडा ३२७ पर्यंत पोहोचतो. त्यात डीएमकेच्या २२ खासदारांची भर पडल्यास हा आकडा ३५० पर्यंत जाऊ शकतो, तरीही आवश्यक संख्येपेक्षा सुमारे १० मते कमी राहण्याची शक्यता आहे.

डिलिमिटेशनसाठी केंद्र सरकारच्या हालचाली?

३० नोव्हेंबरला लोकसभेची । २ डिसेंबरला राज्यसभेची बैठक

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाच्या (डिलिमिटेशन) मुद्यावरून देशात राजकारण तापलेले असताना आणि काँग्रेससह विरोधी पक्षांनी यावर आक्रमक पवित्रा घेतलेला असताना मोदी सरकारने याबाबत पुन्हा एकदा हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचाच भाग म्हणून संसदेच्या दोन्ही सभागृहांची बैठक बोलावल्याचे समजते. त्यानुसार ३० नोव्हेंबरला लोकसभेची आणि २ डिसेंबरला राज्यसभेचे कामकाज होणार आहे. हे कामकाज पावसाळी अधिवेशनाच्या पुढील कामकाजाचा भाग असून, हा कार्यक्रम सभागृहाच्या कामकाजाच्या गरजांवर अवलंबून राहणार आहे. याला विशेष अधिवेशन म्हणता येणार नाही, असे संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी आज सांगितले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कामकाजात विरोधी पक्षाच्या खासदारांच्या गोंधळामुळे अनेकदा अडथळा आला होता. यानंतर १३ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही सदनांचे कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आले होते. मात्र, या अधिवेशनाचा अधिकृत समारोप झाला नव्हता. त्यामुळे राजकीय वाद उफाळला. हिवाळी अधिवेशन बोलावण्यासाठी सरकार करत असलेला उशीर आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनांशी संबंधित समीकरणांची जुळवाजुळव यावरून विरोधकांनी सत्ताधा-यांना घेरले. मात्र, विरोधकांचे आरोप फेटाळून लावत अधिवेशन बोलावण्याचा आणि स्थगित करण्याचा घटनात्मक अधिकार सरकारला असल्याचे उत्तर देण्यात आले. या पार्श्वभूमीवर येत्या आठवड्यात होणाऱ्या बैठका वादळी ठरण्याची शक्यता आहे.

केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी संसदेच्या विशेष बैठकीची माहिती देताना लोकसभेची बैठक ३० नोव्हेंबर २०२६ रोजी तर राज्यसभेची बैठक २ डिसेंबर २०२६ रोजी होईल. दोन्ही सदनांचे कामकाज ३ डिसेंबपर्यंत सुरू राहू शकते, असे सांगितले. सरकारने बोलावलेली लोकसभेची आणि राज्यसभेची बैठक पावसाळी अधिवेशनाचाच भाग असल्याचे रिजिजू यांनी सांगितले. याचा अर्थ पुढील आठवड्यातील कामकाजाला नवे अधिवेशन मानले जाणार नाही.

सरकारने लोकसभेचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे सभापती यांना दोन्ही सदनांचे कामकाज सुरू करण्याची विनंती केली. गरजेच्या सरकारी कामकाजांचा निपटारा करण्यासाठी बैठका बोलावण्यात आल्याचे रिजिजू यांनी सांगितले. कामकाजांच्या गरजा पाहता दोन्ही सदनांच्या बैठका ३ डिसेंबरपर्यंत संपू शकतात, असेही रिजिजू म्हणाले. संसदेच्या या बैठकांत मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

महिला आरक्षणाला निवडणूक मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी जोडणारे संविधान दुरुस्ती विधेयक यंदा १७ एप्रिल रोजी झालेल्या विशेष सत्रात लोकसभेत मंजूर होऊ शकले नव्हते. त्यावेळी या विधेयकाला आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत मिळू शकले नव्हते. हे विधेयक मंजूर न झाल्यापासूनच देशात मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेबाबत आणि लोकसभेच्या जागा वाढविण्याबाबतची चर्चा तीव्र झाली. दरम्यान, राज्यांत १९७१ च्या जनगणनेच्या आधारे सध्याच्या जागांचा हिस्सा कायम ठेवत लोकसभेच्या एकूण जागांमध्ये ५० टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात यावी, असाही प्रस्ताव आहे. दरम्यान, एसआयआरच्या मुद्यावरून विरोधी पक्षांकडून संसदेत चर्चेची मागणी केली जाण्याची दाट शक्यता आहे.

परदेश दौऱ्यांवर जाऊ नका किंवा महत्त्वाच्या कार्यक्रमांचे नियोजन करू नका, अशा सूचना केंद्र सरकारमधील कॅबिनेट मंत्र्यांना आधीच देण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतही या विषयावर चर्चा झाली असून, पंतप्रधानांनी मंत्र्यांना आगामी संसदीय बैठकीसाठी सज्ज राहण्याच्या सूचना दिल्याचे समजते. २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीआधी महिला आरक्षण कायदा लागू करण्याची तयारी सरकारने केल्याची माहिती आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजनांना प्राधान्य द्या

पालक सचिव प्रवीण दराडे । पाणी, चारा नियोजनासह प्रलंबित नळ योजनांची कामे गतीने पूर्ण करा



● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर प्रभावीपणे मात करण्यासाठी उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करून पाणीपुरवठ्याचे स्रोत बळकट करावेत. नागरिकांचे टँकरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी विहिरींसारख्या स्थानिक जलस्रोतांचे बळकटीकरण करण्याबरोबरच पाणीपुरवठ्याच्या कायमस्वरूपी उपाययोजनांना प्राधान्य द्यावे. जिल्ह्यातील प्रगतीपथावरील नळ पाणीपुरवठा योजनांची कामे वेगाने पूर्ण करावीत, तसेच आवश्यकतेनुसार नळ योजनांची विशेष दुरुस्ती करावी, असे निर्देश सहकार विभागाचे प्रधान सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव प्रवीण दराडे यांनी दिले.

पालक सचिव श्री. दराडे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

दुष्काळी परिस्थितीमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक असल्याचे श्री. दराडे यांनी सांगितले. गावपातळीवरील उपलब्ध जलस्रोतांची क्षमता वाढविणे, विहिरींचे बळकटीकरण करणे आणि पाणीपुरवठा योजनांमधील अडचणी दूर करणे यावर भर द्यावा. पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत कसा जिरवावा यासाठी धुळे जिल्ह्यातील शिरपूर पॅटर्न चा अभ्यास करावा. प्रगतीपथावरील नळ पाणीपुरवठा योजनांची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी आगामी हंगामाचे नियोजन आतापासूनच करावे. भविष्यात मका आणि रब्बी ज्वारीच्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत. सिंचन सुविधा उपलब्ध असलेल्या भागांमध्ये चारा पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांना अधिक प्रमाणात चारा बियाणांचे वाटप करावे, अशा सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या.

पारंपरिक चारा उत्पादनासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चारा उपलब्धता वाढविणे आवश्यक आहे. यासाठी हायड्रोपोनिक चारा उत्पादन पद्धतीबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. या पद्धतीची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके शेतकऱ्यांना दाखवून त्यांना या तंत्रज्ञानाची माहिती द्यावी. तसेच जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या चाऱ्याचे योग्य पद्धतीने सूक्ष्म नियोजन करून पशुधनासाठी आवश्यक चारा उपलब्ध राहील, याची दक्षता घ्यावी, असेही श्री. दराडे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची प्रलंबित केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी महसूल विभाग, कृषी विभाग आणि निबंधक कार्यालय यांनी परस्पर समन्वयाने काम करावे. या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देशही पालक सचिव श्री. दराडे यांनी दिले.

बैठकीच्या प्रारंभी निवासी उप जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीपुरवठ्याचे नियोजन, चारा उपलब्धता तसेच दुष्काळ निवारणासाठी जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी विविध विभागांच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याची आवश्यकता यावेळी अधोरेखित करण्यात आली.

वीरभूमी

SPOT NEWS



बाबुजी आव्हाड महाविद्यालयात संविधान दिन साजरा

● पाथर्डी । वीरभूमी–

येथील बाबूजी आव्हाड महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतीय संविधानाचा स्वीकार घटना समितीने केला. त्यामुळे हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अरुण राख यांनी भारतीय संविधान उद्देशपत्रिकाचे वाचन केले व संविधानाचे महत्त्व लोकशाहीच्या यशस्वी मध्ये कशाप्रकारे महत्त्वाचे आहे या संदर्भात मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी भारतीय संविधानामुळेच आज भारताचे अखंडत्व टिकून आहे. संविधानामधील धर्मनिरपेक्ष हे तत्त्वज्ञान अनेक जाती-धर्मांमध्ये एकोपा निर्माण करण्याचे कार्य करते असे ते म्हणाले. या संविधान दिन कार्यक्रमासाठी प्रा. सलीम शेख, डॉ. अजयकुमार पालवे, डॉ. प्रशांत साळवे, डॉ. अभिमन्यू ढोरमारे, प्रा. ब्रह्मानंद दराडे, प्रा. सचिन शिरसाठ, प्रा. अरुण नेहूल व महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

अगस्ती विद्यालयाच्या श्लोक चासकर याची राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड



● अकोले । वीरभूमी –

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय नेटबॉल स्पर्धेत अगस्ती विद्यालयाचा विद्यार्थी श्लोक सचिन चासकर याने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. श्लोक याने आपल्या खेळातील कौशल्य, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्याला क्रीडा शिक्षक ओम बाणाईत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलेजा पोखरकर कार्यवाहक शिरीष नाईकवाडी सतीश नाईकवाडी संदीप नाईकवाडी विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे, व्यवस्थापन समितीचे दत्ता नवले, दौलत कानवडे, प्रकाश साळवे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्लोकचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

२६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रध्दांजली

● अहिल्यानगर । वीरभूमी –

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात देशाच्या रक्षणासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि जवानांच्या स्मृतींना अहिल्यानगरमध्ये भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. लायन्स क्लब ऑफ अहमदनगर, लिओ क्लब, मराठी पत्रकार परिषद, गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील हुतात्मा स्मारक येथे श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुष्पचक्र अर्पण करून तसेच मेणबत्त्या प्रज्वलित करून शहीद वीरांना आदरांजली वाहण्यात आली. उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष हरजितसिंह वधवा, सचिव हरिश हरवाणी, खजिनदार विजय कुलकर्णी, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, प्रकल्प प्रमुख सुनील छाजेड, धनंजय भंडारे, अरविंद पारगावकर, दिलीप कुलकर्णी, जालिंदर बोरुडे, रयत शिक्षण संस्थेच्या जिजामाता कन्या निवासच्या प्रमुख ज्योती मोकळ, बिट्टू मनोचा, प्रशांत मुनोत, कैलाश नवलानी, आशा पालवे, साहेबराव काते, दीपिका शेलार, राजेंद्र घोडके, लिओ क्लबचे अध्यक्ष हर्षवर्धन किथानी, गुरनूरसिंह वधवा आदींसह नागरिक उपस्थित होते. शहीद जवानांच्या बलिदानाचे स्मरण करत उपस्थितांनी त्यांच्या शौर्याला मानवंदना दिली.

ताजनापूर सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याच्या सर्वेक्षणाचा मार्ग मोकळा!

आ. मोनिका राजळे यांची १३ गावांच्या योजनेला निधीची मागणी । कुत्तरवाडी तलाव, मुळा पाटबंधारे आणि वांबोरी बंद चारीच्या कामांबाबतही सकारात्मक चर्चा

● शेवगाव । वीरभूमी –

शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यांच्या पूर्व भागातील दुष्काळग्रस्त गावांना सिंचनाचा लाभ मिळावा, यासाठी प्रस्तावित ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचे सर्वेक्षण तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा १ व २, मुळा पाटबंधारे विभाग आणि अहिल्यानगर पाटबंधारे विभागांतर्गत विविध कामांबाबत जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर) जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक झाली. आमदार मोनिका राजळे यांनी ही माहिती दिली.

याबाबत अधिक माहिती देताना आमदार राजळे म्हणाल्या की, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी शेवगाव येथे झालेल्या टंचाई आढावा बैठकीत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागांतर्गत येणाऱ्या कामांसंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार गुरुवारी मंत्रालयात ही बैठक आयोजित करण्यात आली.



या बैठकीत ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा १ अंतर्गत तत्त्वतः मान्यता मिळालेल्या वरूर, आखेगावसह १३ गावांच्या योजनेसाठी २३९ कोटी ९३ लाख रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच याच टप्प्यातील मंजूर दहिफळ व अन्य सात गावांच्या योजनेच्या दुरुस्तीसाठी २० कोटी ८२ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे. हे काम तातडीने सुरू करण्याबाबत चर्चा झाली.

शेवगाव व पाथर्डी तालुक्यांच्या पूर्व भागातील दुष्काळग्रस्त गावांना सिंचनाचा लाभ मिळावा, यासाठी प्रस्तावित ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा ३ च्या सर्वेक्षणाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून, त्यासाठी ६३ लाख २६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे सर्वेक्षणाचे काम तातडीने सुरू करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

अहिल्यानगर पाटबंधारे विभागांतर्गत कुत्तरवाडी तलावाच्या दुरुस्तीसाठी दोन कोटी रुपयांना मंजुरी मिळाली आहे. या कामाची निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली. मुळा पाटबंधारे विभागांतर्गत चाऱ्यांच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास मंजुरी मिळावी, तसेच वांबोरी बंद चारी योजनेचे आवर्तन टेल टू हेड पद्धतीने मढीपर्यंत सोडण्यात यावे, याबाबतही सकारात्मक चर्चा झाल्याचे आमदार राजळे यांनी सांगितले.

या बैठकीस जलसंपदा विभागाचे सचिव (प्रकल्प व समन्वय) जयंत बोरकर, कार्यकारी संचालक जयंत गवळी, मुख्य अभियंता अरुण नाईक, अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, कार्यकारी अभियंता जगदीश पाटील, सायली पाटील, स्वप्नील काळे आदी अधिकारी उपस्थित होते.

आमदार किशोर दराडे यांच्याकडून मेहेंदुरी विद्यालयास प्रोजेक्टर भेट

● अकोले । वीरभूमी–

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी आणि अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक प्रभावी व रंजक व्हावी, या उद्देशाने आमदार किशोर दराडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक विद्यालय, मेहेंदुरी यांना प्रोजेक्टर भेट दिला.



आजच्या डिजिटल युगात शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांतील संकल्पना चित्रफिती, सादरीकरणे आणि दृकश्राव्य माध्यमातून समजून घेणे अधिक सोपे होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे.

या शैक्षणिक सुविधेबद्दल विद्यालयाच्या वतीने आमदार किशोर दराडे यांचे आभार व्यक्त करण्यात आले. त्यांच्या या सहकार्यामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीस निश्चितच हातभार लागणार आहे.

याप्रसंगी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सुधाकर आरोटे, माजी मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे, माधवराव बंगाळ, महालक्ष्मी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील धुमाळ, श्री बागुल, श्री थोरात, विकास बंगाळ, सचिन वाकचौरे, कैलास फरगडे, सतीश आरोटे, विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर जेठगुले आदींसह विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आ. किशोर दराडे यांनी विद्यालयामध्ये उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

संस्कृती विसरून विकृतीत आनंद मानणे दुर्दैवी

संजय उपाध्ये । भारदे विद्यालयात 'मन करा रे प्रसन्न' विषयावर व्याख्यान

● शेवगाव । वीरभूमी–

आयुष्यात प्रत्येक गोष्ट मनासारखी घडत नसते. अशा वेळी नैराश्य येऊ न देता मन प्रसन्न कसे ठेवावे, याचा मार्ग ज्ञानोबा-तुकोबांसारख्या संतांनी खूप आधीच दाखवून दिला आहे. मात्र, आज आपण तकलादू आधुनिकतेच्या मोहात संस्कृती विसरून विकृतीत आनंद मानत आहोत. ही परिस्थिती बदलण्याची क्षमता केवळ विद्यार्थी आणि शिक्षकांमध्येच आहे, असे प्रतिपादन प्रख्यात व्याख्याते संजय उपाध्ये यांनी केले.



शेवगाव येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित दुसऱ्या गंगा-मृणालिनी व्याख्यानमालेत 'मन करा रे प्रसन्न' या विषयावर तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी शाळेचे गुणवंत माजी विद्यार्थी तथा नगरसेवक आशुतोष डहाळे प्रमुख उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार प्रा. रमेश भारदे, हरीश भारदे आणि रागिणी भारदे यांच्या हस्ते करण्यात आला.

संजय उपाध्ये यांनी संतवचने, अभंग, ओव्या आणि विनोदी कवितांच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचा संदेश दिला. विद्यार्थी जीवनात काय करावे आणि काय टाळावे, याविषयी त्यांनी नेमके व प्रभावी मार्गदर्शन केले. 'आम्ही तिघे भाऊ' आणि 'मन करा रे प्रसन्न' या त्यांच्या कवितांना उपस्थित श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमात अतिथी परिचय सविता रोडी यांनी करून दिला. सूत्रसंचालन नीलेश मोरे यांनी केले, तर मच्छिंद्र लांघे यांनी आभार मानले.

कोतूळ येथील सर्वरोग निदान व उपचार महाआरोग्य शिबिराला प्रतिसाद

९४२ रुग्णांनी घेतला लाभ । ४५ तज्ज्ञ डॉक्टरांचा सहभाग; ५२ रुग्ण शस्त्रक्रियेसाठी प्रवरा रुग्णालयात संदर्भित

● अकोले । वीरभूमी–

श्री वरद विनायक देवस्थान, कोतूळ आणि प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालय व डॉ. बाळासाहेब विखे पाटील ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय यांच्या सहकार्याने रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर रोजी कोतूळ येथे आयोजित भव्य मोफत सर्वरोग निदान व उपचार महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचा एकूण ९४२ रुग्णांनी लाभ घेतला, तर विविध आजारांनी ग्रस्त ५२ रुग्णांना पुढील शस्त्रक्रियेसाठी प्रवरा रुग्णालयात संदर्भित करण्यात आले.

या महाआरोग्य शिबिरात विविध वैद्यकीय विभागांतील तब्बल ४५ तज्ज्ञ डॉक्टर सहभागी झाले होते. मेडिसिन, नेत्रचिकित्सा, अस्थिरोग, स्त्रीरोग, बालरोग, शल्यचिकित्सा, दंतचिकित्सा, कान-नाक-घसा, त्वचारोग आदी विभागांतील रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन व उपचार देण्यात आले. गरजू रुग्णांना पुढील उपचार आणि शस्त्रक्रियांसाठी प्रवरा रुग्णालयात पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी श्री वरद विनायक देवस्थानच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आरोग्य व समाजसेवेच्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. मंदिर हे केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र नसून समाजातील गरजू घटकांसाठी आरोग्य, सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपणारे केंद्र बनावे, ही भूमिका अशा उपक्रमांतून प्रत्यक्षात येत असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले.

यावेळी विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर, प्रांतमंत्री किशोर चव्हाण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक किशोर निर्मळ, माजी आमदार वैभव पिचड, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पाटील गायकर, श्री वरद विनायक देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष के. डी. धुमाळ, ह. भ. प. दीपक महाराज देशमुख, आत्माचे तालुकाध्यक्ष संदीप कडलक, डॉ. सुभाष सोमण, अमोल वैद्य, अमोल आभाळे, सुनील गिते, गणेश धुमाळ, विनय समुद्र, अजित आरोटे, अविनाश गिते, सचिन पाटील, सागर सोनुले, कुलदीप नेवासाकर, संभाजी पोखरकर यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



श्री वरद विनायक देवस्थानच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व उपचाराची सुविधा उपलब्ध झाली. गरजू रुग्णांना वेळेत निदान, उपचार आणि शस्त्रक्रियेचा मार्ग उपलब्ध करून देणारा हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत लाभदायी ठरला. शिबिराला मिळालेल्या प्रतिसादामुळे देवस्थानच्या सेवाभावी कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून, भविष्यातही आरोग्य व समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

इतिहासाच्या साक्षीने समृद्ध झालेली ज्ञानयात्रा!

रायगडाने दिला स्वराज्याचा अभिमान; जिजाऊंनी शिकविले संस्कार, तर प्रतापगडाने जागविला शौर्याचा इतिहास!

शिक्षण म्हणजे केवळ वर्गातील चार भिंतींमध्ये मिळणारे पुस्तकी ज्ञान नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून जीवनदृष्टी समृद्ध करणारा संस्कारप्रवास होय. याच संकल्पनेला मूर्त स्वरूप देणारी न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांची दोन दिवसीय शैक्षणिक सहल नुकतीच उत्साहात संपन्न झाली. एन.डी. स्टुडिओ, कर्जत, स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड, पाचाड येथील राजमाता जिजाऊ वाडा व समाधीस्थळ, किल्ले प्रतापगड आणि निसर्गरम्य महाबळेश्वर या स्थळांच्या भेटीतून विद्यार्थ्यांना इतिहास, संस्कृती, कला, स्थापत्य आणि पर्यावरणाचा अनमोल ठेवा अनुभवता आला.

सहलीचा प्रारंभ एन.डी. स्टुडिओच्या भेटीने झाला. ऐतिहासिक चित्रपटांची निर्मिती, भव्य कलादिग्दर्शन, राजवाडे, दरबार आणि युद्धप्रसंगांची उभारणी यांचे प्रत्यक्ष दर्शन विद्यार्थ्यांसाठी कुतूहलाचा विषय ठरले. इतिहासाचे दृक्श्राव्य माध्यमांतून होणारे सादरीकरण आणि ऐतिहासिक वास्तव यांची सांगड त्यांना समजली.

सहलीचा सर्वाधिक प्रेरणादायी टप्पा म्हणजे किल्ले रायगड! छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची राजधानी म्हणून विकसित केलेल्या या दुर्गावर ६ जून १६७४ रोजी ऐतिहासिक राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला. महादरवाजा, राजदरबार, नगारखाना, बाजारपेठ, गंगासागर तलाव, टकमक टोक, जगदीश्वर मंदिर आणि शिवछत्रपतींची समाधी पाहताना विद्यार्थ्यांना स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाची अनुभूती आली. रायगड म्हणजे केवळ दगडमातीचा किल्ला नसून लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता, दूरदृष्टी आणि नेतृत्वकौशल्याचे विद्यापीठच आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथील राजमाता जिजाऊंचा वाडा आणि समाधीस्थळाने सहलीला संस्कारांचे अधिष्ठान दिले. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत जिजाऊंचे योगदान किती मोलाचे होते, हे विद्यार्थ्यांना समजले. जिजाऊ म्हणजे स्वराज्याच्या संकल्पनेला संस्कारांचे बळ देणारी मातृशक्ती! त्यांच्या समाधीस्थळी नतमस्तक होताना विद्यार्थ्यांनी मातृत्व, त्याग, स्वाभिमान आणि चारित्र्यनिर्मितीचा संदेश आत्मसात केला.

वीरभूमी
प्रा. डॉ. नवनाथ काशिनाथ वाव्हळ
इतिहास संशोधक, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर

यानंतर किल्ले प्रतापगडाने विद्यार्थ्यांच्या मनात शिवशौर्याच्या आठवणी जागवल्या. इ.स. १६५६ मध्ये उभारण्यात आलेल्या या दुर्गाच्या पायथ्याशी १० नोव्हेंबर १६५९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजलखान यांची ऐतिहासिक भेट झाली. भवानीमाता मंदिर, तटबंदी, बुरूज आणि ऐतिहासिक परिसर पाहताना विद्यार्थ्यांना शिवरायांची युद्धनीती, प्रसंगावधान, नियोजन आणि संकटसमयी निर्णयक्षमता यांचे महत्त्व समजले.

महाबळेश्वर येथील प्राचीन शिवमंदिर, पंचगंगा मंदिर आणि निसर्गरम्य परिसराने विद्यार्थ्यांना धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वारशाची ओळख करून दिली. जलस्रोतांचे महत्त्व आणि निसर्गसंवर्धनाची जबाबदारीही या भेटीतून अधोरेखित झाली.

या सहलीच्या यशस्वी नियोजनासाठी संस्थेचे मान्यवर पदाधिकारी, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, रजिस्ट्रार श्री. बबन साबळे, उपप्राचार्य सौ. कल्पना कानवडे आणि पर्यवेक्षक सुभाष गोरे यांचे मार्गदर्शन लाभले. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, त्यांचे कार्यालयीन ओएसडी आर. एस. मिटकरी, गणेश पानसरे आणि निशांत दातीर यांचे विशेष सहकार्य लाभले.

सहलप्रमुख प्रा. कराळे भरत, प्रा. उमाप, प्रा. दूधाडे, सौ. कल्पना कानवडे, प्रा. दत्तात्रय आहेर, प्रा. मीरा जाधव, प्रा. पटारे, प्रा. आकाश नढे आणि प्रा. डॉ. नवनाथ काशिनाथ वाव्हळ यांनी सहलीच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. इतिहास संशोधक प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ यांनी पर्यटक मार्गदर्शकाच्या भूमिकेतून ऐतिहासिक स्थळांची पार्श्वभूमी, घटना आणि वास्तूंचे महत्त्व विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण पद्धतीने समजावून सांगितले.



या सहलीचे खरे यश म्हणजे विद्यार्थ्यांनी केवळ पर्यटन केले नाही, तर इतिहासातून जीवनमूल्ये आत्मसात केली. रायगडाने नेतृत्व शिकविले, पाचाडने संस्कार दिले, प्रतापगडाने शौर्य जागविले, एन.डी. स्टुडिओने सर्जनशीलतेची ओळख करून दिली, तर महाबळेश्वरने निसर्गाशी नाते जोडले.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते–

रायगडाने दिला स्वराज्याचा मान,
जिजाऊंनी दिले संस्कारांचे दान,
प्रतापगडाने जागविला शौर्याचा अभिमान,
अनुभवांच्या शिदोरीने समृद्ध झाले विद्यार्थ्यांचे ज्ञान!

अशा शैक्षणिक सहली म्हणजे पुस्तकी ज्ञानाला अनुभवाची जोड देणारी आणि उद्याचे सुजाण नागरिक घडविणारी ज्ञानाची विद्यापीठेच होत.

SPOT NEWS



२६/११ दहशतवादी हल्ल्याच्या स्मृती दिनानिमित्त शहिद जवानांना आदरांजली

● पाथर्डी । वीरभूमी–

बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये २६ नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबई शहरामध्ये विविध ठिकाणी पाकिस्तानच्या लष्कर – ए – तोयबा या संघटनेच्या दहा दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. तेव्हापासून हा दिवस काळा दिवस म्हणून पाळला जातो. या हल्ल्यामध्ये १६६ निरपराध नागरिकांचा बळी गेला होता तर ३००हून अधिक नागरिक जखमी झाले होते. या दिवसाच्या स्मृतीदिनाची आठवण म्हणून मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप लोकांना व शौर्य दाखवून आपल्या प्राणाची आहुती देणाऱ्या शहीद जवानांना महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) वतीने मेणबत्तीचे प्रज्वलन करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी हा हल्ला म्हणजे मुंबई शहरावर झालेला हल्ला नव्हता तर भारतीय एकता व एकात्मतेवर झालेला हल्ला होता. तो कधीही विसरता येणार नाही असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख कॅप्टन डॉ.अजयकुमार पालवे यांनी केले तर या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.सलीम शेख, डॉ. अरुण राख, डॉ.प्रशांत साळवे, डॉ. अभिमन्यू ढोरमारे, प्रा. ब्रह्मानंद दराडे, प्रा. सचिन शिरसाठ, प्रा. माया पवार, प्रा.आम्रपाली कांबळे प्रा. अश्विनी एडके, प्रा.लीना राठी, प्रा.प्रणिता भावसार वगैरे प्राध्यापक उपस्थित होते.

महात्मा फुले व सेनापती बापट यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारनेरमध्ये कार्यक्रम

● पारनेर । वीरभूमी–

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व शूर स्वातंत्र्यसेनानी सेनापती पांडुरंग महादेव बापट यांच्या पुण्यतिथीनिमित्त पारनेर शहरात शनिवारी (दि. २८ नोव्हेंबर) विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त 'मी ज्योतिराव फुले बोलतोय..!' या एकपात्री नाटकाचे सादरीकरण करण्यात येणार असून, या माध्यमातून महात्मा फुले यांचे विचार आणि सामाजिक कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पारनेर शहरातील लाल चौक येथे महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर सायंकाळी ७ ते ८ या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. लेखक व सादरकर्ते कुमार आहेर सर हे एकपात्री प्रयोग सादर करणार आहेत. महात्मा फुले यांनी शिक्षण, स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि वंचितांच्या हक्कांसाठी केलेल्या कार्याचा विचार या प्रयोगातून मांडण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन व माजी खासदार सुजय विखे पाटील व पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते व महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन पारनेर नगरपंचायतीचे माजी नगराध्यक्ष विजय औटी आणि माजी नगरसेवक नंदकुमार औटी यांनी केले आहे. कार्यक्रमानंतर रात्री ८ वाजल्यापासून उपस्थितांसाठी स्नेहभोजन व दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमातून केवळ पुण्यतिथी साजरी करणे हा उद्देश नसून महापुरुषांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवून सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे विजय औटी यांनी सांगितले. तरी नागरिकांनी सहकुटुंब व मित्रपरिवारासह उपस्थित राहून या प्रेरणादायी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कोतूळ गाव राजूरच्या अपर तहसीलला जोडण्यास विरोध; ११ डिसेंबरला अकोलेत मोर्चा

● अकोले । वीरभूमी –

कोतूळ गावाचा प्रशासकीय कारभार राजूरच्या अपर तहसील कार्यालयाशी जोडण्याच्या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी गुरुवारी रात्री उशिरापर्यंत कोतूळ ग्रामपंचायत कार्यालयासमोर सहविचार सभा पार पडली. या सभेत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, सदर निर्णयाविरोधात शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर रोजी अकोले येथे मोर्चा काढण्याचा एकमुखी निर्णय घेतला. कोतूळ गावाचा प्रशासकीय संबंध अकोले तहसील कार्यालयाशी कायम ठेवण्यात यावा, अशी ग्रामस्थांची भूमिका असून, कोतूळ गाव राजूरच्या अपर तहसील कार्यालयाला जोडल्यास नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी गैरसोयींचा सामना करावा लागणार असल्याची चिंता सभेत व्यक्त करण्यात आली. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि विविध शासकीय कामांसाठी तहसील कार्यालयात जाणाऱ्या ग्रामस्थांच्या सोयीचा विचार करून प्रशासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. या सहविचार सभेत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सिताराम पाटील देशमुख, माजी प्रशासकीय अधिकारी बाळासाहेब देशमुख, सयाजीराव पोखरकर, सोमनाथ पवार, राजेंद्र देशमुख, भाऊसाहेब देशमुख, गणेश घोलप व सुनील गीते यांनी आपले विचार मांडले.

शहरात उद्योग आणि व्यवसायांची वाढ होत असल्याने रोजगारनिर्मितीला चालना

आ. संग्राम जगताप । नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया अन् रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

● अहिल्यानगर । वीरभूमी–

शहरात उद्योग आणि व्यवसायांची वाढ होत असल्याने रोजगारनिर्मितीला चालना मिळत असून, अनेक युवक-युवतींसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत. व्यवसाय करताना सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव जपणाऱ्या वासन परिवाराचे कार्य कौतुकास्पद आहे. सामाजिक जाणिवेतून गरजूंसाठी योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्ट आणि आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरूममध्ये मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आमदार जगताप बोलत होते.

वासन उद्योग समूहाचे चेअरमन विजय वासन यांच्या मार्गदर्शनाखाली मागील १९ वर्षांपासून दृष्टीदोष असलेल्या गरजू रुग्णांसाठी हा सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. केवळ व्यावसायिक प्रगती न साधता समाजातील गरजू घटकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा वासन परिवाराचा हा उपक्रम उल्लेखनीय असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.



यावेळी वासन टोयोटाचे जनक आहुजा, अनिश आहुजा, आनंदऋषीजी नेत्रालयाचे आनंद छाजेड, डॉ. जालिंदर बोरुडे, हरजीतसिंग वधवा, मुन्ना जग्गी, कैलास नवलानी, सुनील थोरात, किशोर मुनोत, संतोष लांडे, विशाल पवार, डॉ. रवींद्र येरीकळे, जनकल्याण ब्लड बँकेचे डॉ. वसंतराव झेंडे, सोनाली कांदारे आदींसह वासन परिवारातील सदस्य उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार जगताप म्हणाले की, सर्वात पहिले गो रक्षणाचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यातून केले. आजच्या काळातही गोसंरक्षणाची मोठी गरज आहे. अरुणोदय गोशाळेचे वारूळाचा मारुती मंदिर परिसरातील नवीन जागेत स्थलांतर झाले असून, प्रशस्त जागेत गोसंरक्षणाचे कार्य सुरू आहे. गोसंरक्षणाबरोबरच सार्वजनिक स्वच्छतेसारख्या सामाजिक उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेतल्यास अशा उपक्रमांना व्यापक स्वरूप प्राप्त होईल.

रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करताना ते म्हणाले की, रक्तदान ही केवळ वैयक्तिक मदत नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी आहे. प्रत्येकाने रक्तदानासाठी पुढाकार घेतल्यास रक्तपेढ्यांमधील रक्ताचा तुटवडा दूर होण्यास मदत होईल. रक्तदान चळवळ अधिक व्यापक करण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सामाजिक बांधिलकी जपत वासन परिवाराच्या वतीने अरुणोदय गोशाळेसाठी एक लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. वासन टोयोटाचे जनक आहुजा यांच्या हस्ते हा धनादेश माजी नगरसेवक संभाजी पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनिश आहुजा यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. प्रास्ताविकात जनक आहुजा यांनी वासन आणि आहुजा परिवाराच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे हे १९ वे वर्ष असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण २११ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी २३ गरजू रुग्णांवर मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच गरजू रुग्णांना नंबरचे चष्मे मोफत वितरित करण्यात आले. याचवेळी आयोजित रक्तदान शिबिरात वासन परिवारातील सदस्यांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. या रक्तदान शिबिरासाठी जनकल्याण ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची जामगावकर यांनी केले.

संविधान दिनानिमित्त पाथर्डीत आरपीआयच्या वतीने संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन

● पाथर्डी । वीरभूमी–



भारतीय संविधान दिन तथा संविधान गौरव दिनानिमित्त गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर) पाथर्डी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेले भारतीय संविधान देशाला अर्पण करण्यात आले. या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय), पाथर्डी तालुक्याच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आरपीआयचे तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. त्यांच्यासोबत उपस्थित तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही संविधान पुस्तिकेतील उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांचे स्मरण करून देणाऱ्या या उपक्रमातून संविधानाप्रती आदर आणि निष्ठा व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी आरपीआयचे तालुकाध्यक्ष बाबा राजगुरू, जिल्हा सरचिटणीस रवींद्र आरोळे, माजी उपजिल्हाधिकारी किशोर राजगुरू, आरपीआयचे ज्येष्ठ नेते सुरेशराव भागवत, लक्ष्मण काळोखे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रकाश शेलार, माजी नगरसेवक रमेश गोरे, दिगंबर गाडे, दिलीप चातुर यांच्यासह आरपीआयचे पदाधिकारी व संविधान प्रेमी कार्यकर्ते, आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'सेवा दूत अभियाना'द्वारे लोककल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवा : प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण

● छत्रपती संभाजीनगर । वीरभूमी–



भारतीय जनता पार्टीच्या वतीने १ ते २५ डिसेंबर २०२६ या कालावधीत देशभरात 'सेवा दूत अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या पूर्वतयारीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित मराठवाडा विभागीय कार्यशाळेला भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी उपस्थित राहून पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत अभियानाचे सूक्ष्म नियोजन, कार्यपद्धती आणि प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना रविंद्र चव्हाण यांनी असे आवाहन केले की, समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांच्या अडीअडचणी व समस्या जाणून घेणे, त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे आणि सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे, हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्वांनी परस्पर समन्वयाने काम करावे.

या विभागीय कार्यशाळेस भाजपाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाशजी, खासदार डॉ. भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार संजय केनेकर यांच्यासह मराठवाडा विभागातील सर्व जिल्हाध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसुंधरा अॅकॅडमीत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन

● अकोले । वीरभूमी–



अभिनव शिक्षण संस्थेच्या वसुंधरा अॅकॅडमी, अकोले येथे गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर) वार्षिक क्रीडा महोत्सव २०२६-२७ चा उद्घाटन समारंभ आणि संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अकोले नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमातून क्रीडाभावना, शिस्त, सांघिक भावना आणि भारतीय संविधानातील मूल्यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात 'आप आये यहाँ खिल गये आज हम' या स्वागतगीताने झाली. स्कूल कॅप्टन दिग्विजय नवले यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत करून कार्यक्रमाची प्रस्तावना केली. परेड कमांडर ओम तळोले याच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचलन केले. निधी आवारी हिने ध्वजवाहकाची जबाबदारी सांभाळली. ब्ल्यू हाऊसची प्रितल चासकर, ग्रीन हाऊसचा सार्थक पेंडभाजे, रेड हाऊसची लावण्या लोहाटे आणि येलो हाऊसची अदिती धिंदळे यांनी हाऊस कॅप्टन म्हणून सहभाग घेतला.

श्रेया वाकचौरे, प्रणव बगणर, विराज धुमाळ, ओवेस शेख आणि ईश्वरी सातपुते यांनी मशाल पथकाची जबाबदारी पार पाडली. तनिष्का तोरमल, समीक्षा बांबळे, रिद्धी जाधव आणि सिद्धी जाधव यांनी पायलट म्हणून सहभाग नोंदविला. या शिस्तबद्ध संचलनामुळे कार्यक्रमात विशेष उत्साह निर्माण झाला.

संविधान दिनाचे औचित्य साधून आराध्या गोडसे हिच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी संविधानाचे सामूहिक वाचन केले. त्यानंतर 'तुम्हा आम्हाला एकच करायचं, वाचायचं संविधान' हे संविधान गौरवगीत सादर करण्यात आले. संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांचे या गीतासाठी मार्गदर्शन लाभले. 'भारत का संविधान' या विषयावरील नृत्य सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांचा प्रभावी संदेश दिला. या नृत्याचे मार्गदर्शन प्रशांत दिवेकर यांनी केले. योगनृत्याचे मार्गदर्शन प्रशांत दिवेकर आणि दिव्या खताळ यांनी केले.

प्रमुख अतिथी नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांचा सत्कार प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख आणि स्कूल कॅप्टन दिग्विजय नवले यांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेचे संस्थापक मधुकरराव नवले यांचा सत्कार व्हाईस कॅप्टन कस्तुरी राऊत आणि उपप्राचार्या राधिका नवले यांनी केला.

आपल्या मनोगतात नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच क्रीडा, शिस्त, सामाजिक जाणीव आणि संविधानातील मूल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. संस्थापक मधुकरराव नवले यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. खेळातून खिलाडूवृत्ती, संघभावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित होतो, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील श्वेता कानकाटे आणि सान्वी झोळेकर यांनी केले. यासाठी प्राजक्ता नेटके यांचे मार्गदर्शन लाभले. व्हाईस कॅप्टन कस्तुरी राऊत हिने उपस्थितांचे आभार मानले.

दि. २६ व २७ नोव्हेंबर असे दोन दिवस आयोजित या वार्षिक क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'Play, Compete, Achieve' हे ब्रीद घेऊन आयोजित महोत्सवातून विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता वाढविण्यासोबतच सांघिक भावना, शिस्त, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांना प्रोत्साहन दिले जात आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी क्रीडा शिक्षक पंकज धुमाळ आणि दिव्या खताळ यांनी विशेष परिश्रम घेतले. प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख आणि उपप्राचार्या राधिका नवले यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले.

क्रीडा स्पर्धांचा उत्साह आणि संविधानातील मूल्यांचा जागर अशा दुहेरी उद्देशाने पार पडलेल्या या महोत्सवातून विद्यार्थ्यांना देशप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि खिलाडूवृत्तीचा प्रेरणादायी संदेश मिळाला.

खेळातून मिळतात भविष्यातील करिअरच्या संधी शोधा : ज्ञानेश्वर खुरांगे

राजूर प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचे मवेशीत उद्घाटन । ३९ आश्रमशाळांतील १,०९४ खेळाडूंचा सहभाग

● अकोले । वीरभूमी–



आजच्या धावपळीच्या युगात सुदृढ शरीरासाठी खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका खेळात नैपुण्य मिळवून त्यातून भविष्यातील करिअरच्या संधी शोधाव्यात, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या वतीने आयोजित तीन दिवसीय प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धांचे गुरुवारी (दि. २६ नोव्हेंबर) मवेशी येथील क्रांतिवीर राघोजी भांगरे क्रीडानगरी, शैक्षणिक संकुलात उत्साहात उद्घाटन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खुरांगे बोलत होते.

या स्पर्धेत राजूर प्रकल्पांतर्गत असलेल्या २१ शासकीय आणि १८ अनुदानित अशा एकूण ३९ आश्रमशाळांमधील खेळाडू सहभागी झाले आहेत. केळी रुम्हणवाडी, केळी कोतूळ, अकलापूर आणि मवेशी या चार केंद्रांतील केंद्रस्तरीय स्पर्धांमध्ये यशस्वी ठरलेले ५१० मुले आणि ५८४ मुली असे एकूण १ हजार ९४ खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. दि. २६ ते २८ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेतील विजेते खेळाडू धुळे येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी विकास विभाग, नाशिकचे उपआयुक्त राजेंद्रकुमार हिवाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे आणि राजूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला २६ नोव्हेंबर संविधान दिन आणि २६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतिदिनानिमित्त शहीदांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मान्यवर, खेळाडू आणि शिक्षकांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. खेळाडूंना खिलाडूवृत्तीची शपथही देण्यात आली.

प्रकल्पाधिकारी देवकन्या बोकडे यांनी प्रास्ताविकातून तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाची रूपरेषा आणि नियोजनाची माहिती दिली. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळाकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता करिअरची संधी म्हणूनही पाहावे, असे सांगितले.

उपआयुक्त राजेंद्रकुमार हिवाळे यांनी खेळातील भविष्यातील करिअरच्या विविध संधींची माहिती देत आश्रमशाळांमधून दर्जेदार खेळाडू घडावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात आमदार डॉ. किरण लहामटे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच खेळालाही महत्त्व देण्याची गरज अधोरेखित केली.

यावेळी साहित्यिक आदिनाथ सुतार लिखित आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित 'सह्याद्रीचे शौर्यतारे' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

व्यासपीठावर प्रकल्पाधिकारी देवकन्या बोकडे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी दीपक कालेकर, प्रकाश ढोणे, सांख्यिकी अधिकारी शंतनू डांगे, उपलेखाधिकारी दत्तात्रेय धाडवड, वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक कमलाकर हंडीबाग, मवेशीचे सरपंच यमाजी भांगरे, माजी सरपंच कमलताई बांबळे आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल भांगरे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ गायकवाड आणि मुकुंद सूर्यवंशी यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शिवराज कदम, शिवाजी नरके, पंडित कदम, चंदन बडवे, किशोर शिंदे, जगन्नाथ जाधव, मेजर बांबळे यांच्यासह विविध आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, समित्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सदस्य, खेळाडू, पीआरटीसीचे प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थी पंच आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गणेशकुमार कागदे, रोहिदास वाघचौरे, प्रकाश नारकर, भूषण साठे, मंगल लोंढे, अधीक्षक भाऊसाहेब पटेकर यांच्यासह सर्व आश्रमशाळांचे शिक्षक, अधीक्षक, स्त्री अधीक्षिका, क्रीडा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

भगवानगडच्या पाणीप्रश्नासाठी महामार्गावर चार तास रास्ता रोको!

प्रताप ढाकणे, प्रा. लक्ष्मण हाके यांचा शासनावर हल्लाबोल । ताजनापूर लिफ्ट क्र. ३ च्या सर्वेक्षणासह जलजीवनची कामे आठ दिवसांत सुरू करण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

● पाथर्डी । वीरभूमी –

भगवानगड परिसरातील गावांना ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या लिफ्ट क्र. ३ मधून शेतीसाठी पाणी द्यावे, तसेच जलजीवन मिशनची रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाने बुधवारी उग्र रूप धारण केले. प्रल्हाद कीर्तने यांच्या उपोषणाच्या पाचव्या दिवशी खरवंडी कासार येथे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ वर तब्बल चार तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. प्रशासनाने मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन दिल्यानंतर उपोषण आणि रास्ता रोको मागे घेण्यात आला.

सकाळपासूनच खरवंडी कासार येथे पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, आंदोलकांचा वाढता आक्रोश पाहता महिला, शेतकरी आणि युवकांनी बैलगाड्यांसह महामार्गावर ठिय्या दिला. त्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. वाहतुकीची मोठी कोंडी झाली.

भगवानगड परिसर हा ऊसतोड मजूर, शेतकरी आणि कष्टकरी नागरिकांचा भाग आहे. या परिसरातील शेतीच्या पाण्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. ताजनापूर उपसा सिंचन योजनेतून पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी आंदोलकांची भूमिका आहे.

या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रताप ढाकणे आणि ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला. यावेळी शासनाच्या धोरणांवर जोरदार टीका करताना त्यांनी, 'हा दुष्काळ निसर्गाने नव्हे, तर शासनाने लादलेला आहे,' असा आरोप केला. 'भगवानगड परिसराला पाणी मिळाले तर कारखान्यांवरील ऊस तोडण्यासाठी मजूर कुठून आणणार?' असा खोचक सवालही त्यांनी उपस्थित केला. ऊसतोड कामगारांच्या कष्टावर साखर कारखाने चालतात; मात्र त्यांच्याच गावांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो, ही दुर्दैवी बाब असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या आक्रमक भाषणामुळे आंदोलनाला अधिक धार आली.

यावेळी ॲड. प्रताप ढाकणे आणि संजय बडे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना धारेवर धरले. पाण्याचा प्रश्न इतकी वर्षे प्रलंबित का आहे? जलजीवन मिशनची कामे अर्धवट का आहेत? शेतीच्या पाण्यासाठी ठोस नियोजन का केले जात नाही? असे सवाल उपस्थित करण्यात आले. अनेक प्रश्नांवर अधिकारी निरुत्तर झाल्याचे चित्र होते.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार उद्धव नाईक, गटविकास अधिकारी राजेंद्र धस, जलजीवन मिशनचे उपअभियंता श्रीरंग कुलकर्णी आणि पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता अश्विनी घोटेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जलजीवन मिशनची रखडलेली कामे येत्या आठ दिवसांत सुरू करण्यात येतील. तसेच ताजनापूर उपसा सिंचन योजनेच्या लिफ्ट क्र. ३ मधून पाणी उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करून योजना राबविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली. या आश्वासनानंतर प्रल्हाद कीर्तने यांनी उपोषण मागे घेतले. त्यानंतर रास्ता रोको आंदोलनही स्थगित करण्यात आले.

पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलनस्थळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ॲड. प्रताप ढाकणे, संजय बडे, संगीता ढवळे, सुभाष केकान, महादेव दराडे, लहू दराडे, अशोक गोल्हार, वसंतराव खेडकर, सुनील ढाकणे, माणिकमामा खेडकर, डॉ. ज्ञानेश्वर दराडे, अर्जुन पाटील अंदुरे, मालेवाडीच्या माजी सरपंच चंद्रकला खेडकर, किरण खेडकर, पांडुरंग खेडकर, मालेवाडीचे सरपंच सुनील खेडकर, महारुद्र कीर्तने, आजिनाथ कीर्तने, प्रदीप पाटील अंदुरे, नितीन कीर्तने, संजय कीर्तने, वामन कीर्तने, एकनाथवाडीचे माजी उपसरपंच देविदास खेडकर, मोहनदादा ढाकणे यांच्यासह भगवानगड परिसरातील असंख्य नागरिक सहभागी झाले होते.



अंबिकानगर शाळेतील विद्यार्थ्यांना स्पोर्ट गणवेश व लेखन साहित्याचे वाटप

● अकोले । वीरभूमी–

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबिकानगर व अंगणवाडी केंद्र अंबिकानगर येथे गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रवरा प्रतिष्ठान, ढोकरी व अंबिकानगर यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट गणवेश तसेच राजस्लेट व पाटीचे वाटप करण्यात आले.



विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. माजी विद्यार्थी आणि सामाजिक संस्थांनी शाळेप्रती असलेली आपुलकी जपत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी पुढाकार घेतल्याने या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

याप्रसंगी प्रवरा प्रतिष्ठानचे श्री. सौरभ पुंडे, सिताराम पाटील शेटे, निलेश पुंडे, रामनाथ करवर, खंडू मेंगाळ, विकास शिंगोटे, अमीन शेख, पंढरीनाथ मेंगाळ उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक अशोक पथवे व सहशिक्षिका लता लांडगे मॅडम यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक अशोक पथवे सर यांनी केले. उपस्थितांचे आभार सहशिक्षिका लता लांडगे मॅडम यांनी मानले. माजी विद्यार्थी आणि प्रतिष्ठानच्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी व शिक्षणाप्रती असलेली सकारात्मक भावना अधोरेखित झाली.

भांडगाव शाळेत संविधान दिनानिमित्त बालविवाह निर्मूलनाची सामूहिक प्रतिज्ञा

● पारनेर । वीरभूमी–

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भांडगाव येथे भारतीय संविधान दिन उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या संविधानातील मूलभूत मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांसह उपस्थितांना समजावून सांगण्यात आले.



कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे उपस्थित मान्यवरांना भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात आली. संविधानातील मूलभूत हक्क, नागरिकांची कर्तव्ये, लोकशाही मूल्ये आणि प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. संविधानाची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावी आणि नागरिकांनी संविधानाचा आदर करून त्यातील मूल्यांचे आचरण करावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी सामाजिक जनजागृतीच्या दृष्टीने बालविवाह निर्मूलनाची सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. बालविवाह ही समाजाला लागलेली गंभीर कुप्रथा असून त्यामुळे मुला-मुलींच्या शिक्षणावर, आरोग्यावर आणि भविष्यावर विपरीत परिणाम होतो. बालविवाह होऊ देणार नाही, अशा घटनांना विरोध करू आणि समाजात याबाबत जनजागृती करू, असा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

विद्यार्थ्यांमध्ये संविधानाविषयी आदर, लोकशाही मूल्यांची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याबरोबरच बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक बाळासाहेब सालके व मुख्याध्यापक अप्पासाहेब नरवडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी सरपंच लताताई भुजबळ, उपसरपंच उमेश खरमाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशोर खरमाळे, उपाध्यक्षा सविता भुजबळ, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गणेश खरमाळे, उपाध्यक्ष गणेश शेलार, ग्रामपंचायत अधिकारी शिल्पा शिंदे, मीना पवार, अंगणवाडी सेविका संगीता जाधव, सुनीता कुटे, शारदा जाधव, कांताबाई खरमाळे, उषा खरमाळे, राणी शिंदे, छबूबाई गजरे, निशा गजरे यांच्यासह ग्रामस्थ व अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.संविधानाचा सन्मान आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकास पात्र ठरला.

जिल्हा बँकेतील विजयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मा.आ.वैभवराव पिचड यांचे अभिनंदन!

पेढा भरवून केले कौतुक । अकोले तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील विकासकामांवर चर्चा

● अकोले । वीरभूमी–

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या निवडणुकीत विजय संपादन केल्याबद्दल माजी आमदार वैभवराव मधुकरराव पिचड यांचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले. सदिच्छा भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी पिचड यांना पेढा भरवून विजयाबद्दल शुभेच्छा दिल्या.

या भेटीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वैभवराव पिचड यांच्यात अकोले तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध विकासात्मक प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. यामध्ये सहकार क्षेत्रातील प्रश्न, ग्रामीण विकास, तसेच जनहिताच्या महत्त्वपूर्ण विषयांवर विचारविनिमय करण्यात आला.

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत सर्वाधिक मतांनी विजय मिळविल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी स्वतः अभिनंदन केल्याने पिचड यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या भेटीमुळे अकोले तालुक्यातील विकासाच्या प्रश्नांना शासनस्तरावर अधिक गती मिळणार असल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होताना दिसत आहे.



पाथर्डी तालुक्यात जनावरांसाठी व शेळ्या, मेंढ्यासाठी चारा छावण्या सुरू करण्याची निवेदनाद्वारे मागणी

● पाथर्डी । वीरभूमी–

यावर्षी राज्यातील अनेक जिल्ह्यांसह पाथर्डी तालुक्यावर अतिशय भयानक दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. यावर्षी पावसाने मारलेल्या दडीमुळे तालुक्यात पाण्याचा व चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे पशुधन वाचवणे शेतकऱ्यांपुढे मोठे आव्हान झाले आहे. तसेच शेळ्या, मेंढ्यासाठी देखील चारा व पाण्याची सोय करणे गरजेचे आहे. सध्या पाथर्डी तालुकात साखर कारखाने सुरू असल्याने थोडेफार प्रमाणात चारा मिळत आहे, परंतु येथे आठ दहा दिवसांमध्ये कारखाने बंद झाल्यानंतर शेतकऱ्यांना चारा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे चाऱ्याचा प्रश्न मोठा असल्याने त्याचबरोबर पाणी देखील पुरेसे नसल्याने पाथर्डी तालुक्यात लवकरात लवकर जनावरांसाठी व शेळ्या, मेंढ्यासाठी चारा छावण्या सुरू करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष नानाभाऊ पडळकर, परमेश्वर टकले यांच्यासह पाथर्डी तालुक्यातील विविध गावच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.



तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांना दिलेल्या निवेदनामध्ये तालुक्यातील शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी चारा छावणीसह शेळ्या, मेंढ्या यांच्याही चारा व पाण्याची सोय करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्यांचा तातडीने शासनस्तरावर विचार व्हावा व कार्यवाही करावी. अन्यथा पंधरा दिवसानंतर तहसील कार्यालयात जनावरांनासह मोर्चा काढण्यात येईल असा इशारा देखील निवेदनात दिलेला आहे.

सदर निवेदन नायब तहसीलदार किशोर सानप यांनी स्विकारले. संपूर्ण तालुक्यातील शेतकऱ्यांच्यावतीने हे निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर परमेश्वर टकले, प्रकाश कचरे, नानाभाऊ पडळकर, गोरक्ष हंडाळ, बंडु जाधव, देवीदास काळे, तुषार टकले आदींच्या सह्या आहेत.

आनंदबाजार ही विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची खरी ओळख करुन देते

प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे । आनंदबाजारातून १ लाख ६५ हजार ९८५ रुपयांची रुपयांची उलाढाल

● पाथर्डी । वीरभूमी–

विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणातून व्यवहार ज्ञान प्राप्त होणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांना विविध ज्ञानाची भूक भागवण्यासाठी विविध उपक्रम शालेय स्तरावर राबवणे ही काळाची गरज आहे यासाठी विद्यालयात संविधान दिनाचे औचित्य साधून आनंदबाजारचे (फूड फेस्टिवल) आयोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांना कृतीयुक्त व्यावहारिक ज्ञान प्राप्त होते तसेच आनंद बाजार यामधून विद्यार्थ्यांना व्यवसायिक शिक्षणाची ओळख होते असे प्रतिपादन बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.ए.चौरे यांनी केले.

पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर पाथर्डी या शाळेत संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांच्या संकल्पनेतून गेल्या १८ वर्षापासून आनंदबाजार (फूड फेस्टिवल) हा उपक्रम अविरतपणे सुरू आहे. विद्यार्थ्यांना कृतीयुक्त ज्ञान प्राप्त व्हावे,विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान आकलन व्हावे. तसेच विद्यार्थ्यांना विविध वस्तूंची देवाण-घेवाण करता यावी. विद्यार्थ्यांमध्ये बोलण्याची कला विकसित व्हावी तसेच विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमाची ओळख व आवड निर्माण व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला

आनंदबाजारचे उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी बाबूजी आव्हाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे, संस्थेचे सदस्य कुणाल आव्हाड, केंद्रप्रमुख मच्छिंद्र गोरे, केंद्रप्रमुख दगडू महांडुळे, मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके,मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, संपत घारे व बहुसंख्येने पालक माता भगिनी तसेच शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या महोत्सवामध्ये शाळेतील ४४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन जवळपास ३१८ विविध पदार्थांचे स्टॉल विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी ठेवले होते. या बालआनंद मेळाव्यात भाजीपाला, किराणा दुकान, मिठाईचे पदार्थ, खाद्यपदार्थ,पाणीपुरी, फळ विक्रेते, तसेच शेतातील काही भाज्यांचे विद्यार्थ्यांनी स्टॉल सजवले होते.

यामध्ये विद्यार्थ्यांनी एकूण १ लाख ६५ हजार ९८५ रुपयांची कमाई केली. आनंद बाजारसाठी पालकांनी उपस्थित राहून भरपूर प्रतिसाद दिला. खवय्येगिरांनी फूड फेस्टिवलचा मनमुराद आनंद लुटला.पालकांनी उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

उपक्रम यशस्वीतेसाठी जयश्री एकशिंगे, मनीषा गायके, आशा बांदल,राधिका सरोदे, ज्योती हंपे,कीर्ती दगडखैर, विद्या घोडके, ऋषिकेश मुळे, आदीनाथ फाजगे, कैलास भोसले, बाळू हंडाळ यांनी परिश्रम घेतले.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com